*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# पंडित नेहरू आणि राष्ट्र उभारणी

**श्रेयश गुरुदास मोहिते**

संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

.......................................................................................................................

**प्रस्तावना–**

15 ऑगस्ट 1947 रोजी जवळपास दीडशे वर्षानंतर भारत ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला आणि देशात स्वकीयांचे शासन सुरु झाले. 15 ऑगस्ट 1947 ते 27 मे 1964 या कालावधीत तब्बल 16 वर्षे 286 दिवस पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय गणराज्याचे पहिले पंतप्रधान म्हणून उत्कृष्टरीत्या काम पहिले. नेहरूंच्या रूपाने देशाला एक वैचारिक व उच्चविद्याविभूषित कायदेपंडित, धर्मनिरपेक्ष विचारसरणीचे, नेतृत्वगुण संपन्न, आंतरराष्ट्रीय घडामोडींची सूक्ष्म जाण असणारे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे लोकशाही मुल्यांना जोपासणारे पंतप्रधान मिळाले. पंडित नेहरूंच्या दिव्यवलयी व्यक्तिमत्वाचा प्रभाव केवळ भारतावरच नव्हे सबंध जगावर होता. भारतीय स्वातंर्त्यलढा, संविधान सभेचे काम तसेच नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणांचा पाया घालण्यापासून ते देशांतर्गत विविध क्षेत्रातील विकासाचे धोरण ठरवण्यामध्ये नेहरूंचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. फाळणी आणि गरिबीचा वारसा मिळालेल्या भारताला तत्कालीन द्वीधृवीय आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एक सशक्त सार्वभौम राष्ट्र म्हणून उभे करण्यात पंडित नेहरूंचा सिंहाचा वाटा आहे. या संशोधन लेखाच्या माध्यमातून पंडित नेहरूंचे भारताचे एकत्रीकरण आणि राज्यांची पुनर्रचना, योजना आयोग, भारतातील शहरीकरण, भारतीय चित्रपट–कला–साहित्य, जागतिक अलिप्ततावादी चळवळ यावरील योगदानाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीतील नेहरूंचे महत्व समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**पंडित नेहरूंचा जीवन परिचय–**

जवाहरलाल मोतीलाल नेहरू यांचा जन्म 14 नोव्हेंबर 1886 रोजी अलाहाबाद येथे काश्मिरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील मोतीलाल नेहरू हे तत्कालीन अलाहाबादमधील नामांकित श्रीमंत वकील व भारतीय स्वातंर्त्यलढ्यातील महत्वाचे नेते होते. 1916 ते 1928 कालावधी दरम्यान ते राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते. पाश्चात्य संस्कृतीबद्दल आकर्षण असणाऱ्या मोतीलाल नेहरूंनी आपल्या मुलास वयाच्या पंधराव्या वर्षी शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले. जवाहरलाल नेहरूंचे उच्चशिक्षण ब्रिटन मधील जगातील नामांकित केंब्रीज विद्यापीठामध्ये झाले. जिथे त्यांच्यावर लोकशाही व फेबियन समाजवादी मूल्यांचे, आधुनिकतावादाचे संस्कार झाले. पाटील आणि नारायण(1998) यांच्या मतानुसार ब्रिटनमधील बऱ्याच काळच्या वास्तव्यात त्यांनी भारतीय इतिहास, समाजव्यवस्था, वैश्विक समाजव्यवस्था यांचा अभ्यास केला. त्यामुळे त्यांना भारतीय सामाजिक– आर्थिक आणि राजकीय समस्यांबद्दल निरीक्षणाच्या आधारे विश्लेषण करता येऊ लागले. त्यामुळेच पुढे जाऊन आधुनिक भारताच्या उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या विचारसरणीची बैठक ते घडवू शकले.

1912 मध्ये भारतात परत आल्यावर त्यांनी अलाहाबाद येथे वकिलीचा व्यवसाय करू लागले. 1916 साली त्यांची महात्मा गांधींबरोबर भेट झाली व ते खूप प्रभावित झाले. पुढे 1919 च्या असहकार आंदोलनापासून महात्मा गांधींबरोबर त्यांनी स्वातंर्त्यलढ्यात सक्रीय सहभाग घेण्यास सुरवात केली. या कारणाने नेहरूंनी भारतात प्रवास केला, अनेकदा तुरुंगवास भोगला. हळूहळू राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या कमिट्यांच्या बैठकींचे नेतृत्व करू लागले. भारताच्या 'पूर्ण स्वराज्याची' मागणी सर्वप्रथम नेहरूंनी 1929 च्या लाहोर अधिवेशनामध्ये केली होती. राष्ट्रीय काँग्रेसचे पुढारी म्हणून काम करताना संघटनेच्या आर्थिक आणि राजकीय विचारसरणीचा पाया रचताना तिचे ध्येय आणि उद्दिष्टे रचण्यात नेहरूंनी प्रमुख भूमिका निभावली. खरे पाहता, तत्कालीन भारतीय स्वातंर्त्यलढा, भारताचा राष्ट्रवाद आणि पाश्चात्य साम्राज्यवाद यांमधील संघर्ष, भारताची आर्थिक– सामाजिक– राजकीय परिस्थिती आणि भारतीयांची वाढती आकांक्षा यांचा नेहरूंच्या लोकशाही, राज्यघटनावाद, प्रातिनिधिक सरकार, जनतेचे सार्वभौमत्व, जनतेचे मुलभूत हक्क आणि अधिकार, नागरिक आणि नागरी स्वातंर्त्याचा अधिकार, कायद्याचे राज्य, आर्थिक– सामाजिक– राजकीय न्याय, धर्मनिरपेक्षता, विश्वबंधुत्व असणारा राष्ट्रवाद आणि मानवतावाद यासंबंधी विचारसरणीवर सखोलपणे

परिणाम झाला.(पाटील आणि नारायण 1998) ज्याचा प्रभाव स्वातंर्त्यानंतर आधुनिक भारताच्या उभारणीसंबंधी नेहरूंनी घेतलेल्या अनेक निर्णयांमध्ये दिसून येतो.

स्वातंर्त्यानंतर नेहरूंच्या नेतृत्वाखाली संसदेत देशातील अनेक समस्यांवर, धोरणांवर सविस्तर चर्चाध वादविवाद केले जाई. स्वतःकडे प्रबळ बहुमत असूनही नेहरूंनी त्यांच्या कारकिर्दीत नगण्य अस्तित्व असणाऱ्या विरोधी पक्षनेत्यांचा, त्यांच्या मताचा आदर करत वेळोवेळी लोकशाही मूल्य जोपासले असल्याचे दिसते. एका आदर्श संसदेचे कामकाज कसे चालविले गेले पाहिजे याचे उत्तम उदाहरण त्यांनी भावी पिढीला घालून दिले. भारतीय राजकारणात येणाऱ्या अटल बिहारी वाजपेयींसारख्या अनेक तरुण नेतृत्वाला मग तो कोणत्याही पक्षाचा असो, ते प्रोत्साहन देत असत. पंतप्रधानपदाबरोबर भारताचे परराष्ट्र खातेदेखील त्यांच्याकडेच होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात सुद्धा त्यांनी अलिप्ततावादी चळवळीचे नेतृत्व करत स्वतःचा दबदबा तयार केला होता. यादरम्यान नेहरू लोकप्रियतेच्या अत्युच्य शिखरावर होते. 1962 च्या भारत–चीन युद्धानंतर भारताची मोठी हानी झाली त्यामुळे त्यांची प्रकृती ढासळू लागली आणि 27 मे 1964 रोजी वयाच्या 74 व्या वर्षी हृदयविकाराचा झटका येऊन त्यांचे दिल्ली येथे देहावसान झाले. त्यांच्या पत्नीचे नाव कमला तर मुलगीचे नाव इंदिरा होते. पुढे याच इंदिरा गांधी भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान बनल्या.

**नेहरू आणि भारताचे एकत्रिकरण आणि राज्यांची पुनर्रचना–**

भारताला स्वातंर्त्य मिळाल्यानंतर भारतामध्ये 15 ऑगस्ट 1947 ते 15 एप्रिल 1952 पर्यंत पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली 'हंगामी सरकार' कार्यरत होते. दरम्यान 26 जानेवारी 1950 पासून भारतीयांनी भारतीयांसाठी तयार केलेली 'भारतीय राज्यघटना' अंमलात आणली गेली. ज्यानुसार सार्वभौम भारतीय गणराज्याद्वारे 'संसदीय लोकशाही शासन प्रणाली' चा स्वीकार केला गेला आणि भारतामध्ये भारतीयांचे स्वराज्य सुरु झाले. 1951–52 साली लोकसभेची पहिली सार्वत्रिक निवडणूक पार पडून 15 एप्रिल 1952 रोजी पुन्हा जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली खऱ्या अर्थाने स्वतंत्र भारताचे पहिले सरकार अस्तित्वात आले.

दरम्यान भारताला स्वातंर्त्य मिळाल्यानंतरच्या कालावधीत भारतात घडलेली महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे भारतीय गणराज्यात तत्कालीन संस्थानांचे केले गेलेले विलीनीकरण होय. फाळणी झाल्यानंतर सर्व संस्थानिकांना एकतर पूर्णपणे पाकिस्तानमध्ये किंवा पूर्णपणे भारतात सामील होण्यासाठी अथवा स्वतंत्र देश स्थापन करण्याचे आवाहन केले गेले. काही संस्थाने पाकिस्तान किंवा भारतात लगेच विलीन झालीत परंतु काहींना विलीन होण्यास वेळ लागला. काही संस्थानांनी स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला परंतु नंतर लवकरच भारतात किंवा पाकिस्तानात समाविष्ट झालीत. उदा.– जम्मू आणि काश्मीर, कळत, इ. काही ठिकाणी संस्थानिकांना एका देशात जायचे होते तर तेथील जनतेला दुसऱ्या देशात आश्यावेळी लोकभावनेला महत्व देत अनेक संस्थाने खालसा करण्यासाठी पोलीस बळाचाही वापर केला गेला. उदा.– हैद्राबाद संस्थान. या सर्व प्रक्रियेत देशात अनेक संस्थाने सामील करून घेताना तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल व व्ही. पी. मेनन यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. त्यावेळी या सर्व संस्थांनांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार तनखे देण्याचे मान्य करून त्यांना भारतीय संघराज्यात विलीन करण्यात आले.

या सर्व प्रक्रियेमुळेच भारतीय भूखंडावरील सर्व प्रदेश भौगोलिक, शासकीय आणि प्रशासकीयदृष्ट्या एकत्रित बांधला गेला.(अपवाद जम्मू आणि काश्मीर) भारतीय राज्यघटनेच्या नियंत्रणाखाली आणि पटेल–मेनन व नेहरू यांच्या प्रयत्नांनी आपला देश खऱ्या अर्थाने एकसंघ बनला. राज्यघटनेतील चौथ्या प्रकरणातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार भारतात सामाजिक आणि आर्थिक सुधारणांचा नवा अध्याय सुरु झाला. ज्यामुळेच अनेक कल्याणकारी शासकीय निर्णय योजना यांची अंमलबजावणी करता येऊ लागली. देशहिताच्या दृष्टीने निर्णय घेणे सरकारला सोयीस्कर पडू लागले.

1950 साली भारतीय राज्यघटनेने राज्यकारभार चालवण्याच्या दृष्टीकोनातून तत्कालीन भारतीय प्रदेशांची वर्गवार राज्य विभागणी केली होती. ज्यानुसार भारतीय भूभागाचे पुढील चार प्रकारात विभाजन करण्यात आले होते.

- 'अ' वर्ग राज्य– हा पूर्वी ब्रिटीश गव्हर्नरचे शासन असलेला असलेल्या प्रांतांचा वर्ग होता. परंतु आता त्यांचा राज्यकारभार हा भारताच्या राष्ट्रपतींनी नेमलेले राज्यपाल आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या विधिमंडळामार्फत चालवले जाई. या 9 राज्यांमध्ये आसाम, बिहार, बॉम्बे, मध्य भारत (तत्कालीन मध्य प्रांत आणि बेरार राज्य), मद्रास, ओरिसा, पंजाब (तत्कालीन पूर्व पंजाब), उत्तर प्रदेश (तत्कालीन संयुक्त प्रांत आणि औंध राज्य) आणि पश्चिम बंगाल.
- 'ब' वर्ग राज्य– हा पूर्वी राजांद्वारे चालवले जाणारी संस्थाने आणि संस्थानांच्या समूहाचा तसेच राज्य विधिमंडळ शासन असलेल्या राज्यांचा वर्ग होता. परंतु आता त्यांचा कारभार भारताच्या राष्ट्रपतींनी नेमलेल्या राजप्रमुखांच्या आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या विधिमंडळामार्फत चालवला जाई. या 8राज्यांमध्ये हैद्राबाद, जम्मू आणि काश्मीर, मध्य भारत, म्हैसूर, पटीयाला आणि पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र आणि त्रावणकोर–कोचीन यांचा समावेश होता.
- 'क' वर्ग राज्य– हा पूर्वी ब्रिटीश उच्च आयुक्तद्वारा चालवल्या जाणऱ्या प्रांतांचा आणि काही राज्यांद्वारे चालवल्या जाणाऱ्या संबंधित संस्थानांचा वर्ग होता. परंतु आता त्यांचा कारभार भारताच्या राष्ट्रपतींनी नेमलेल्या चीफ कमिशनरद्वारा चालवले जाई. या 10 राज्यांमध्ये अजमेर, भोपाळ, बिलासपुर, कुर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कच्छ, मणिपूर, त्रिपुरा आणि विंध्य प्रदेश यांचा समावेश होता.
- 'ड' राज्य– या प्रकारात एकमेव प्रदेश असलेल्या अंदमान व निकोबार द्वीपसमूहाचा समावेश केला गेला ज्याचा राज्यकारभार आता केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या नायब राज्यपालद्वारा चालवला जाई.

ब्रिटिशांनी त्यांच्या काळात प्रशासकीय सोयीनुसार प्रांत व राज्य तयार केले होते. धार्मिक किंवा सांप्रदायिक आधारावर राज्यांच्या पुनर्रचनेस नेहरूंचा प्रचंड विरोध होता(कोशी ल्यूक, २०१६). स्वातंर्त्यपूर्व काळापासून भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना व्हावी यासाठी तत्कालीन बंगाल, मद्रास, बिहारमध्ये चळवळी उभ्या राहिल्या होत्या. 1936 साली भाषेच्या आधारावर बिहार मधून ओरिसा प्रांताची निर्मिती झाली होती. स्वातंर्त्यानंतर नेहरू सरकारने राज्यपुनर्रचना करण्यासाठी एस. के. धर आयोग(1947) जे.व्ही.पी. समिती(1948), फाजल अली कमिशन(1953) यांची एकानंतर एक अशी स्थापना केली होती. या प्रत्येक आयोगांनी आपापला अहवाल सादर केला. दरम्यान तत्कालीन मद्रास राज्यामध्ये तेलगु भाषिकांसाठी स्वतंत्र आंध्रपदेश राज्याच्या निर्मितीची घोषणा करण्यात आली होती. फाजल अली कमिशनने सप्टेंबर 1955 मध्ये बऱ्यापैकी सविस्तर असा अहवाल शासनास सादर केला. त्यातील अनेक शिफारशी मान्य करत, काही अमान्य करत तर काहींमध्ये थोडाफार बदल करत 'राज्य पुनर्रचना अधिनियम,1955' व 7 वी घटनादुरुस्ती' 1956 मध्ये अंमलात आणली गेली.
1नोव्हेंबर 1956 रोजीच्या राज्य पुनर्रचनेनुसार मूळ घटनेतील राज्यांचे चार गटातील विभाजन रद्द करून त्याजागी भाषिक तत्वावर 16 घटक राज्ये (बॉम्बे, आंध्र प्रदेश, म्हैसूर, आसाम, बिहार, जम्मू आणि काश्मीर, केरळ, मध्यप्रदेश, मद्रास, उडीसा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल) व 6 केंद्रशासित प्रदेश(दिल्ली, हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, अंदमान व निकोबार द्वीपसमूह आणि लखदिव, मिनिकॉय व अमिनदिवी द्वीपसमूह) निर्माण केले गेले.

याकाळात बॉम्बे स्टेटला द्वैभाषिक राज्य ठेवण्यावर नेहरूंचा भर होता. परंतु गुजरात आणि संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या मागणीच्या लोकाग्रहास्तव त्यांना त्यांचा आग्रह मागे घ्यावा लागला. त्यामुळे 1मे 1960 रोजी बॉम्बे राज्याचे विभाजन होऊन 'गुजरात' आणि 'महाराष्ट्र' राज्यांची निर्मिती झाली. दादरा आणि नगर हवेली हे प्रदेश पोर्तुगीजांपासून स्वतंत्र झाल्यानंतर 11 ऑगस्ट 1954 रोजी ते 11 ऑगस्ट 1961 पर्यंत एक स्वतंत्र प्रदेश म्हणून अस्तित्वात होते. याचे भारतात विलीनीकरण करताना नेहरूंच्या आग्रहास्तव लोकशाही तत्वानुसारच करण्यात आले. यासाठी के.जी. बदलानी या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याला एका दिवसासाठी पंतप्रधान बनविले गेले. त्यामुळे बदलानी आणि नेहरू या दोन पंतप्रधानांमध्ये करार होऊन 11 ऑगस्ट 1961रोजी 'दादरा आणि नगर हवेली' भारतीय संघराज्यात विलीन केले गेले आणि त्याला केंद्रशासित प्रदेश बनविले गेले. 'गोवा, दीव आणि दमन' हे पोर्तुगीज सरकारच्या अधिपत्याखालील तीन वेगवेगळे प्रदेश होते. भारत सरकारने या प्रदेशातील शासकांविरुद्ध पोलीस कारवाई करून 19 डिसेंबर 1961 रोजी 'गोवा, दमन व दीव'

भारतीय संघराज्यात विलीन केले आणि त्यांना एकत्रित करून त्याच नावाचा नवीन केंद्रशासित प्रदेश बनविला गेला.

दरम्यान 1नोव्हेंबर 1954 रोजी पॉन्डेचेरी, कारिकल, यनम, माहे आणि चंदननगर हे भारतातीलच तत्कालीन विविध राज्यात असणारे प्रदेश तेथील फ्रेंच शासकांनी भारताकडे सुपूर्द केले होते. परंतु फ्रांस सरकारची मान्यता न मिळाल्यामुळे हे प्रदेश अधिकृतरीत्या भारतीय संघराज्यात विलीन होऊ शकले नव्हते. तोपर्यंत या प्रदेशांचे प्रशासन अधिग्रहित क्षेत्र रूपाने चालविले गेले. १६ ऑगस्ट १९६२ रोजी या प्रदेशांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरणाला फ्रेंच सरकारचे अनुमोदन मिळाले आणि पॉन्डेचेरी, कारिकल, यनम आणि माहे या चार वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या प्रदेशांना एकत्रित करून 'पॉन्डेचेरी' या नवीन केंद्रशासित प्रदेशाची निर्मिती केली गेली. तसेच 'चंदननगर' हा प्रदेश पश्चिम बंगाल राज्याला जोडला गेला. 1डिसेंबर 1963 रोजी आसामचे विभाजन होऊन 'नागालँड' राज्याची निर्मिती झाली.

अश्याप्रकारे डिसेंबर 1963 पर्यंत भारतात जम्मू आणि काश्मीर, पंजाब, उत्तरप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, ओरिसा, प.बंगाल, आसाम (नॉर्थ इस्ट फ्रन्टीयार एजन्सी सहित), नागालंड, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश,तामिळनाडू, केरळ ही 16 घटक राज्ये व दिल्ली, हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, गोवा दमन दीव, दादरा आणि नगर हवेली, पॉन्डेचेरी, लखदिव मिनिकॉय व अमिनदिवी द्वीपसमूह, अंदमान व निकोबार द्वीपसमूह हे 9 केंद्रशासित प्रदेश होते. अश्याप्रकारे विविध युरोपीय देशांच्या वर्चस्वातून भारतातील सर्व प्रदेश भारतीय गणराज्यात लोकशाही मार्गाने नेहरूंच्या नेतृत्वाखाली विलीन झाले होते.

**नेहरू आणि योजना आयोग–**

योजना आयोगाची संकल्पना सर्वप्रथम स्वातंत्र्यापूर्वी तत्कालीन राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष नेताजी बोस यांनी मांडली होती. त्यानुसार एक योजना समिती बनवून एम. विश्वेश्वरैय्या यांना अध्यक्ष निवडून दिले गेले. परंतु मेघनाद शहा यांनी मध्यस्थी करत विकासाच्या योजना आणि राजकारण यांचा अन्योन्य संबंध पटवून देत विश्वेश्वरय्या यांना पाय उतार होण्यास भाग पडले व पंडित नेहरूंची त्याठिकाणी वर्णी लागली. नंतरच्या कालावधीत नेहरू ज्यावेळी भारताबाहेर तत्कालीन प्रगत देशात गेले, त्यावेळी संबंधित देशातील विकासाला अनुकूल ठरलेल्या अनेक संस्थांना, संशोधन केंद्रांना, विद्यापीठांना ते जाणीवपूर्वक भेट देत.(उदा. अमेरिकेतील एम.आय.टी.) या संस्थांच्या कार्याने प्रभावित झाले व अश्याप्रकारच्या संस्था भारतात देखील उभ्या करण्याचा त्यांचा निर्धार झालेला दिसून येतो. पंतप्रधान झाल्यावर या प्रसिद्ध संस्थांमधील तज्ञ व्यक्तींना बोलावून त्यांनी भारताच्या विकासाला अनुकूल अनेक संस्थांची उभारणी केल्याचे दिसते. स्वातंत्र्यानंतर भारताच्या आर्थिक–सामाजिक विकासासाठी योजनाबद्ध आराखड्याची गरज ओळखून पंडित नेहरूंनी 15 मार्च 1950 रोजी भारताच्या 'योजना आयोगा'ची स्थापना करून स्वतः त्याचे अध्यक्ष झाले. योजना आयोगाच्या माध्यमातून सोव्हियत युनियन रशियाच्या पंचवार्षिक योजना पद्धतीचा स्वीकार करत नेहरूंनी भारतात पंचवार्षिक योजनांची सुरवात केली. शासन ही केवळ पोलीसी यंत्रणा नसून त्याला एक कल्याणकारी जबाबदारी आहे ही भूमिका नेहरूंनी घेतली. याद्वारे कृषी विकासाबरोबर औद्योगिकीकरणाची गती वाढविण्याच्या प्रयत्नांना चालना मिळाली

1951 मध्ये भारताची पहिली पंचवार्षिक योजना जाहीर केली, जी पूर्णतः शेती क्षेत्राच्या विकासावर केंद्रित होती. ज्यामध्ये सिंचन आणि विद्युतनिर्मिती, शेती आणि समुदाय विकास, दळणवळण आणि संपर्क साधनांचा विकास, निर्वासितांचे पुनर्वसन आणि सामाजिक सेवा यावर जोर दिला गेला. या अंतर्गत भाक्रा, हिराकूड ही मोठी धरणे बांधलीत. तसेच मेट्टूर आणि दामोदर व्हॅली धरणांची उभारणी सुरु केली. त्यादरम्यान पावसाने साथ दिल्यामुळे पीक चांगले होऊन भारताचे आर्थिक उत्पन्न वाढून आर्थिक क्षेत्राची उन्नती सुरु झाली. यादरम्यान भारताचा आर्थिक विकासाचा दर 3.6 टक्यांवर जाऊन पोहोचला. दरम्यान खरगपूर येथे 'इंडियन इन्स्टीट्युट ऑफ टेक्नोलॉजीची', 'इंडियन इन्स्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्स' आणि 'इंडियन इन्स्टीट्युट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन'ची स्थापना करण्यात आली. 1954 साली पुणे येथील 'नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी'ची पायाभरणी नेहरूंनी केली. तसेच उच्च शिक्षणाच्या विकासासाठी व सक्षमीकरणाच्या उद्देशाने 'विद्यापीठ

अनुदान आयोग'ची स्थापना करण्यात आली. तसेच जागतिक आरोग्य संघटनेच्या बरोबरीने नेहरू सरकारने बालकांच्या आरोग्यात सुधारणा करण्यावर भर दिला जेणेकरून भारतातील बालमृत्यूचे प्रमाण घटले.

दुसरी पंचवार्षिक योजना ही सार्वजनिक क्षेत्राशी संबंधित होती. याअंतर्गत जलविद्युत केंद्रांच्या उभारणीबरोबर भिलाई, दुर्गापूर, रुरकेला, बोकारो या ठिकाणी 5 पोलाद निर्मितीचे कारखाने उभारले. पंतप्रधान पंडित नेहरूंनी या कारखान्यांचे वर्णन 'भारताची आधुनिक मंदिरे' असे केले होते. भारतात कोळसा उत्पादन वाढविले गेले. तसेच उत्तर–पूर्व भागात रेल्वेचे जाळे पसरण्यास सुरवात झाली. दरम्यान 1954 मध्ये 'टाटा इन्स्टीट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्च' आणि भारताच्या अणुऊर्जा आयोगाचे नुतनीकरण करण्यात येऊन, आर्थिक सहकार्य करत त्यांच्या विकासाला वाव दिला. स्थापना करण्यात आली. यादरम्यान 'अप्सरा' या अणुभट्टीची उभारणी केली गेली. बॉम्बे, मद्रास, कानपूर आणि दिल्ली येथे आणखी 4 'इंडियन इन्स्टीट्युट ऑफ टेक्नोलॉजीची' तसेच दुर्गापूर, जमशेदपूर, नागपूर, सुरत, भोपाळ, वारंगल, सुरथकल, श्रीनगर, आणि अलाहाबाद या 8 ठिकाणी 'प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालयांची' (यांचे 2002 पासून 'नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ टेक्नोलॉजी' असे नामकरण करण्यात आले.) उभारणी केली. या सर्वांची स्थापना करताना प्रादेशिक समतोल साधल्याचेही आपणास लक्षात येते. पुढे 1965पर्यंत यांची संख्या 15 वर नेली. संशोधन क्षेत्रास वाव देण्यासाठी अनेक शिष्यवृत्ती सुरु करण्यात आल्या. नवी दिल्ली येथे 1956 मध्ये ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस आणि मौलाना आझाद मेडिकल कॉलेज, 1961 मध्ये गोविंद वल्लभ पंत इन्स्टीट्युट ऑफ पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च यांची उभारणी केली. ऊर्जा क्षेत्रात देशाला बळकटी येण्यासाठी 'ओएनजीसी'ची सुरवात केली. तसेच भारताची संरक्षण व्यवस्था वेळोवेळी अत्याधुनिक ठेवण्यासाठी 1958 मध्ये संरक्षण खात्यांतर्गत 'डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन'(डिआरडीओ) ची स्थापना केली. या दरम्यान भारताचा विकासाचा दर 4.27 टक्यांवर जाऊन पोहोचला.

तिसरी पंचवार्षिक योजना कृषी क्षेत्र विशेषतः गव्हाच्या उत्पादन वाढीवर जोर देणारे, सिमेंट आणि खतप्रकल्प उभारणीवर जोर देणारे ठरले. तसेच ग्रामीण भागात प्राथमिक शाळांच्या उभारणीकडे नेहरूंनी नेहरूंनी लक्ष दिले. सत्तेचे विकेंद्रीकरण करून राज्यांना विकासासंबंधी अधिकार दिले व पंचायतींमध्ये निवडणुका सुरु करून तळागाळात लोकशाही बळकट होण्यास सुरवात केली. राज्यांमध्ये विद्युत महामंडळे व राज्य रस्ते वाहतूक महामंडळ यांची स्थापना करण्यात आली. तसेच राज्यांमध्ये माध्यमिक शिक्षण बोर्डांची स्थापना करण्यात येऊन राज्यांकडे माध्यमिक आणि उच्चशिक्षणाची जबाबदारी देण्यात आली. नेहरूंनी नोव्हेंबर आणि डिसेंबर 1961 मध्ये अनुक्रमे कलकत्ता आणि अहमदाबाद येथे 'इंडियन इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट'ची स्थापना केली. त्याच वर्षी 'नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ डिझाईन' ची सुद्धा स्थापना केली गेली.तसेच 1962 मध्ये भारतीय अवकाश संशोधन संघटना(इस्त्रो)ची खरी पायाभरणी केली. 1962 च्या भारत– चीन युद्धाचा या योजनेवर परिणाम पडला गेला व भारताचा विकासाचा दर 2.4 टक्यांवर जाऊन पोहोचला.

**पंडित नेहरू आणि भारतातील शहरीकरण–**

स्वातंत्र्याबरोबर झालेल्या फाळणीमुळे भारताच्या पश्चिम सरहद्दीवरून आलेले निर्वासितांचे मोठे लोंढे उत्तर भारतातील तत्कालीन शहरांमध्ये जाऊन वसले गेले. या लोंढ्यांचा त्या त्या शहरांवर नगरांवर अनेक बाबतीत परिणाम होऊन त्याच्या भावी विकासावरही परिणाम होणार होता हे अचूक ओळखून नेहरूंनी यंत्रणा राबवून सुरवातीला मोठ्या प्रमाणात निर्वासितांसाठी छावण्यांची सोय केली व त्यानंतर या स्थलांतरित लोकांना राहण्यासाठी भूखंडाचे वितरण केले गेले. तसेच 1951 ते 1961दरम्यानच्या पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये शहर विकासासंबंधित योजना या केवळ घरकुले उभारणी आणि निर्वासितांच्या पुनर्वसनाशी संबंधित असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात जवाहरलाल नेहरू यांनी 3 एप्रिल 1923 ते 28 फेब्रुवारी 1935 दरम्यान अलाहाबाद नगरपालिकेचे अध्यक्षपद भूषविले होते. कदाचित त्यामुळेच शहरी भागाच्या योग्य नियोजनाची गरज ओळखून भारतातील सर्व नागरी संस्थांमध्ये एकसूत्रीपणा आणण्याच्या हेतूने 1954 मध्ये तत्कालीन नेहरू सरकारने भारतीय राज्यघटनेतील कलम 263 नुसार नागरी स्वराज्य संस्थांसाठी केंद्रीय

परिषदेची स्थापन केली 1958 पर्यंत ग्रामीण आणि नागरी या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी याचे काम चाले. त्यानंतर केवळ नागरी स्वराज्य संस्थेसाठी ही परिषद कार्य करू लागली. तिसऱ्या योजनांमध्ये शहर विकासाच्या धोरणांनी आणि योजनांनी जोर पकडला. दरम्यान शहरांसाठी 'मास्टर प्लॅन' नावाची संकल्पना उदयास आली. दिल्ली मास्टर प्लॅन 1962 चे अनुकरण करत टाऊन आणि कंट्री प्लॅन्निंग कायदयानुसार इतर शहरांनीसुद्धा विकासाचा आराखडा करण्यास सुरुवात केली.

1951 साली भारताची एकूण लोकसंख्या 36.10 करोड व शहरी लोकसंख्या 6.24 करोड इतकी होती, ती 1961 साली वाढून अनुक्रमे 43.92 करोड व 7.89करोड इतकी झाली. 1951 साली भारतात 10लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारी कलकत्ता, बॉम्बे, दिल्ली, मद्रास आणि हैद्राबाद ही 5महानगरे होती. त्यात अहमदाबाद आणि बेंगलोर यांची भर पडून 9611 साली 7 महानगरे झालीत. तसेच 1950 साली एकूण 10महानगरपालिका भारतात अस्तित्वात होत्या त्यांची संख्या मे 1964 साली 25 इतकी झाली. सार्वजनिक क्षेत्रातील विविध योजनाध प्रकल्पामुळे भिलाई, दुर्ग, बोकारो, रुरकेला, रांची, इ. शहरांना महत्व येऊ लागले होते. त्यामुळे संबंधित शहरांची वाढ जोमाने होऊ लागली. प्रसिद्ध संग्रहालयतज्ञ डॉ. पी. शर्मा यांच्या मते चंदिगढ शहर उभारणी हे नेहरूंचे स्वप्न होते. 'चंदिगढ' या स्वतंत्र भारताच्या पहिल्या आधुनिक अश्या योजनाबद्ध शहराची उभारणी जरी फ्रेंच वास्तूविद्याविशारद ले कार्बूजिए यांनी केली असली तरी त्यामागची संकल्पना ही नेहरूंची होती. नेहरूंनी त्यांच्या उभारणीत स्वतः जातीने लक्ष दिले होते.(हिंदुस्तान टाईम्स, 28 मे 2014). पुढे 1966 मध्ये 'चंडीगड' शहरास केंद्रशासित प्रदेश घोषित करून पंजाब आणि हरियाणा राज्यांची संयुक्त राजधानी बनविले गेले.

**नेहरू आणि भारतीय चित्रपट व कलासृष्टी**

आज जगामध्ये भारत सर्वाधिक चित्रपट बनविणारा देश ठरला आहे. भारतीय चित्रपट जगातील अनेक देशांमध्ये दाखविला जाऊन त्यांना अनेक सन्मान आणि कौतुक प्राप्त होत आहे. या भारतीय चित्रपटांना उभारी देण्यात पंडित नेहरूंच्या योगदानाची दखल घेणे गरजेचे आहे. इतर सर्व क्षेत्रांबरोबर नेहरूंनी स्वतः भारतीय चित्रपटांच्या दर्जा सुधारण्यासाठी आणि विकासासाठी केलेले कार्य लक्षणीय असे आहे. आज देशातील अनेक सरकारद्वारा चालवल्या जाणाऱ्या चित्रपट संस्थांची सुरवात नेहरूंनी केलेली दिसते. भारतीय चित्रपटांना नवी दिशा देण्यासाठी 29 ऑगस्ट 1946 रोजी त्यांनी 'फिल्म इनक्वायरी कमिटी'ची स्थापना केली. ज्याने 1951 मध्ये दिलेल्या अहवालातून सेन्सॉर बोर्डची संकल्पना, चित्रपट महोत्सव, चित्रपट विकास व प्रसारसंबंधी अनेक सूचना दिल्या गेल्या. त्यातील अनेक सूचनांवर नेहरूंनी तातडीने अंमलबजावणी सुरु केली. स्वतः नेहरूंना कला, साहित्य, संस्कृतीमध्ये आवड असल्यामुळे भारतीय संस्कृतीची ओळख जगामध्ये व्हावी अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे 24 जानेवारी ते 1 फेब्रुवारी 1952 दरम्यान मुंबई येथे 'भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव'चे आयोजन करत आशिया खंडात पहिल्यांदाच चित्रपट महोत्सव भरवण्यास सुरवात केली. पुढे दिल्ली, चेन्नई, कोलकाता, त्रिवेंद्रम इ. ठिकाणी महोत्सव सुरु झाले. यातून अनेक देशातील संस्कृतीची, कलेची देवाणघेवाण होऊ लागली. तसेच चांगल्या चित्रपटांना प्रोत्साहन देण्यासाठी १९५३ पासून 'राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार' सुरु केले. ज्यामध्ये सबंध भारतातील अनेक भाषांतील चित्रपटांना प्रतिनिधित्व प्राप्त होऊन त्यांची झलक पाहायला मिळते. मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, जीवनमुल्यांची ओळख व्हावी म्हणून 1955 साली 'चिल्ड्रन फिल्म सोसायटी'ची स्थापना केली. नेहरूंच्या पुढाकाराने भारतातील संगीत, नाट्य, नृत्य व साहित्य क्षेत्राच्या विकासासाठी राष्ट्रीय स्तरावर 1953 मध्ये संगीत नाटक अकादमी, 1954 मध्ये साहित्य अकादमी व 1956 साली राष्ट्रीय नाट्य विद्यालयाची स्थापना केली. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांचे जतन व्हावे व चित्रपट क्षेत्रात संशोधन होऊन त्याचा विकास व्हावा व पुढील पिढीला हा वारसा प्राप्त व्हावा, या हेतूने पुण्यामध्ये फेब्रुवारी 1964 मध्ये 'राष्ट्रीय फिल्म संग्रहालय'ची स्थापना केली. अश्या अनेक संस्थांतून आजवर अनेक मोठे कलाकारध्तंत्रज्ञ भारताला प्राप्त झालेले पहावयास मिळतात, हे नेहरूंच्या दूरदृष्टीचे यशच म्हणावे लागेल.

**नेहरू आणि अलिप्ततावादी चळवळ**

अलिप्ततावादाचा सिद्धांत ही पंडित नेहरूंची भारताला आणि जगाला दिलेली एक देणगी होय. दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धकालीन वातावरणात जगाचे अमेरिका समर्थक आणि सोव्हियत युनियन रशिया समर्थक अशी द्विध्रुवीय विभागणी झाली होती. यावेळी नेहरूंनी पुढाकार घेऊन आशिया, आफ्रिका आणि काही पूर्व युरोपातील देशांना एकत्र करून वरील दोघांपैकी कुणाकडेही न जाता जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी व या देशांच्या विकासासाठी अलिप्ततावादी चळवळ सुरु केली. सुकर्णो, यू नू, गमाल नासेर, जोसिप टिटो, आणि जवाहरलाल नेहरू हे या अलिप्ततावादी चळवळीचे जनक होय. या अंतर्गत पंचशील तत्वांचा स्वीकार केला गेला. तत्कालीन जगाच्या राजकारणात कोणत्याही एका बाजूला न झुकता नेहरूंनी भारताचे सार्वभौमत्व टिकवून ठेवले, ही अत्यंत महत्वाची बाब म्हणावी लागेल. नव्याने उदयास आलेल्या तिसऱ्या जगातील देशांना नेहरूंनी राष्ट्र विकासाचा आणि शांततेचा मार्ग दाखवला. त्यातून त्या त्या देशाचे सार्वभौमत्व सुरक्षित राहून एकमेकांच्या मदतीने विकासाच्या वाटा खुल्या झाल्या. उदाहरणार्थ, सुदानसारख्या तिसऱ्या जगातील गरीब देशाने निवडणूक प्रक्रियेचे संबंधी मार्गदर्शनाची मागणी केल्यावर भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त सुकुमार सेन यांना सुदानला पाठविण्यात नेहरूंनी अनुकुलता दर्शवली होती. अश्या अनेक प्रकारे विकसनशील राष्ट्रांना मदत करून नेहरूंनी जगामध्ये भारताचा सन्मान वाढविला होता. या चळवळीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणावर, युनोच्या धोरणांवर मोठा प्रभाव पडला. पंडित नेहरूंनी 1960 मध्ये बेंगलोर येथील एका भाषणात म्हणाले होते, "भारताच्या स्वातंत्र्यानंतर जगाचे लक्ष भारताकडे वेधून घेण्यात काही प्रमुख गोष्टी आहेत व्यापक दृष्टीकोन असलेला आंतरराष्ट्रीय संबंध विशेषतः अलिप्ततावादी धोरण."

**समारोप–**

15 ऑगस्ट 1947 रोजी जवळपास दीडशे वर्षांनी भारत स्वतंत्र झाला परंतु देशाला वारसा म्हणून ब्रिटिशांनी फाळणी, भयानक रक्तपात, हिंसाचार, दारिद्र्य आणि ढासळलेली अर्थव्यवस्था दिली आणि त्यांनी निरोप घेतला. त्यावेळी भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून एकाद्या व्यक्तीला किती कामगिरी करावी लागेल हे समजून घेणे उचित ठरते. देशाची सामाजिक–आर्थिक परिस्थिती सुधारत ब्रिटीश इंडियाची ओळख पुसून नवीन स्वतंत्र भारताची प्रतिमा जगासमोर आणणे हे आव्हानात्मक काम जवाहरलाल नेहरू यांनी करून दाखविले. आपल्या मंत्रिमंडळाच्या मदतीने संस्थानांचे विलीनीकरण आणि राज्यांची पुनर्रचना यांसारखे अतिशय क्लिष्ट प्रश्न सोडवत संविधानिक मार्गांनी भारताचे एकत्रीकरण घडवून आणले. तसेच योजना आयोगाच्या माध्यमातून भारतात विविध पायाभूत सुविधांची उभारणी करत अनेक घटकांना मुख्य प्रवाहात आणले. ज्याच्या आधारावर आज राज्यकर्त्यांना राज्य करणेध् प्रशासकांना प्रशासन चालविणे सोयीस्कर पडत असल्याचे दिसून येते. राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या अभियांत्रिकी, व्यवस्थापकीय, आरोग्य, ऊर्जा, संरक्षण संशोधनसंबंधी अनेक संस्थांच्या उभारणीसाठी नेहरूंनी पुढाकार घेतलेला दिसतो. तसेच औद्योगिक विकास करत असताना अनेक शहरांच्या विकासाकडेही लक्ष दिले. आज भारतातील कला–साहित्य–संस्कृती व चित्रपटांची भरभराट होण्यास व देशाबाहेर त्याचा प्रसार करण्यास नेहरूंची दूरदृष्टी मोलाची ठरल्याचे दिसते. 1950 च्या दशकात जगाच्या पटलावर अनेक लोकशाही राष्ट्रांचा आणि तिथल्या राष्ट्रप्रमुखांचा उदय झाला. परंतु ज्याप्रमाणे घानाचे क्वामेह एनकृमाह, इंडोनेशियाचे सुकार्णो हे कालांतराने हुकुमशहा बनले तसे नेहरूंच्या बाबतीत झाले नाही. किंबहुना लोकशाहीची मुल्ये त्यांनी देशात रुजवलीत आणि भारताला जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारे राष्ट्र बनविले. शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर द्विध्रुवी राजकारणापासून भारताला आणि अनेक अविकसित धविकसनशील छोट्याध्मोठ्या देशांना अलिप्त ठेवण्यामध्ये आणि त्यांच्या विकासामध्ये नेहरूंच्या अलिप्ततावादी धोरणाची भूमिका अनन्यसाधारण अशी होती.

आज भारतात नेहरूंच्या तत्कालीन धोरणांवर, व्यक्तिमत्वावर अनेक प्रकारे शिंतोडे उडवून त्यांची प्रतिमा जाणीवपूर्वक मलीन केली जात आहे. नेहरूंनी घेतलेले अनेक निर्णय कसे चुकीचे होते हे सांगत देशाच्या विकासातील त्यांचे योगदान फोल असल्याचे बिंबविले जात आहे. हे सर्व राजकीय स्वार्थापोटी केले आज आहे हे आता लपून राहिले नाही. तसेच भारताच्या प्रमुख पदावर कार्य

केलेल्या एखाद्या व्यक्तीच्या कार्यांचा मान राखून स्वतः नवनिर्मितीवर काम करून भावी पिढीसाठी आदर्श घालून देणे उचित आहे असे वाटते. म्हणूनच स्वातंर्त्यानंतरच्या परिस्थितीत देशासमोरील विविध आव्हानांचा सामना करत भारताच्या आर्थिक– सामाजिक– राजकीय विकासाला तात्विक बैठक प्राप्त करून देत सदैव नवनिर्मितीवर भर देणाऱ्या पंडित नेहरूंना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' म्हणतात ते योग्यच आहे.

**संदर्भ–**


1. Shroff Bhomi, Role of Jawaharlal Nehru in Nation Building, JETIR August 2017, Volume 4, Issue 8, ISSN-2349-5162
2. Patil V.T. & Narayan(1998), An Assessment of Nehru's Contribution to Constitution Making In India, Neharu and Constititionalism: An Overview, Devika Publications: Delhi, pg 105-106
3. Guha R (2007), India After Gandh, Picador Publications: India
4. Butler, Lord (1966), Jawaharlal Nehru- The Freedom for Independence, Cambridge Unversity Press, London
5. https://censusindia.gov.in/ भारतीय जनगणना १९५१ आणि १९६१
6. Singh, R., & Arya, A. (2006). NEHRU'S STRATEGY OF NATIONAL INTEGRATION. *The Indian Journal of Political Science, 67*(4), 919-926. Retrieved May 1, 2020, from www.jstor.org/stable/41856275
7. Kothari Rajni(july 1964), The Meaning of Jawaharlal Nehru, The Economic Weekly
8. https://www.pmindia.gov.in/en/former_pm/shri-jawaharlal-nehru/
9.' राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५५'
10. '७ वी घटनादुरुस्ती' १९५६
11. http://allahabadmc.gov.in/about_ann.html

१२. Koshi, Luke(2 November 2016). The reorganization of states in india and why it happened. The News Minute.

१३. Swati Garg(12 May 2011). Q&A: Shekhar Chaudhary, Director, IIM Calcutta. Business Standard.

१४. 'About IIMA'. Indian Institute of Management Ahmedabad. Retrieved 1 May 2020.

१५. "Institute History- Indian Institute of Technology". IIT Kharagpur. Archived from the original on 20 April 2008. Retrieved 22 October 2008.

१६. http://nitcouncil.org,in/index.php/sit/console/siteAboutNit

१७. https://web.archive.org/web/20100923134945/http://www.tifr.res.in/History_and_Archives/timeline.html

१८. https://www.navjivanindia.com/india/pandit-nehru-played-an-important-role-in-grooming-indian-cinema-the-film-world-reached-the-pinnacle-with-his-vision